जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JAN 2018
महाराष्ट्र टाईम्स

# डॉ. उल्हास माळकर यांची निवड



**मिरज :** शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र परिषदेच्या अध्यक्षपदी प्रा. डॉ. उल्हास माळकर यांची निवड करण्यात आली. कुंडल (ता. पलूस) येथील क्रांती अग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यायात अर्थशास्त्र परिषदेचे वार्षिक अधिवेशन पार पडले. यामध्ये प्रा. डॉ. माळकर यांची निवड करण्यात आली. २०१७ ते २०२२ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी त्यांची शिवाजी विद्यापीठ व्यावसायिक अर्थशास्त्र अभ्यास मंडळावरही सदस्य म्हणून निवड झाली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 9 JAN 2018
सकाळ

# स्त्रियांना समानतेची वागणूक हा महात्मा फुलेंचा आग्रह होता : प्रा. शिंदे

कोल्हापूर, ता. १८ : स्त्रियांना समानतेच्या वागणुकीसह उच्च स्थान मिळावे, हा महात्मा फुले यांचा आग्रह होता, असे मत प्रा. अरुण शिंदे यांनी आज येथे व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठात आयोजित पी. बी. साळुंखे व्याख्यानमालेत 'महात्मा फुले व सार्वजनिक सत्यधर्म व सद्य:स्थिती' विषयावर ते बोलत होते. आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे शिक्षणशास्त्र विभागाच्या सभागृहात व्याख्यान झाले. प्रा. शिंदे म्हणाले, ''धर्मसंस्थेमध्ये स्त्रियांना स्थान नाही. त्याचबरोबर दुय्यम भूमिका त्यांच्यावर लादली आहे. हे महात्मा फुलेंनी सप्रमाण सिद्ध केले होते. स्त्रियांना केवळ समानतेची वागणूक नव्हे तर उच्च स्थान दिले पाहिजे, याचा आग्रह त्यांनी आपल्या लेखणीतून मांडला.'' फुले यांच्या सार्वजनिक सत्यधर्माची वैशिष्ट्ये सांगून सर्वधर्म समभाव मानणारा हा धर्म आहे. सत्यशोधक समाजाने कर्मकांडे डोळसपणे नाकारावीत व बुध्दिप्रामाण्यवादाने सामर्थ्यवान व्हावे, अशी अपेक्षा फुलेंनी व्यक्त केली होती, असेही त्यांनी सांगितले. या प्रसंगी अभिजित साळुंखे, प्र-संचालिका व विभागप्रमुख डॉ. सुमन बुवा उपस्थित होते. प्रा. यशोधन बोकील यांनी प्रास्ताविक केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JAN 2018
तरुण भारत

# वीज दुर्घटना टाळण्यासाठी योग्य साधनांचा वापर करा

**कोल्हापूर :** विजेमुळे होणारे संभाव्य अपघात टाळण्यासाठी विज आणि विजेची उपकरणे हाताळण्याबद्दल घरातील व्यक्तींनी माहिती घ्यावी. विजेमुळे होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी सुरक्षेच्या सर्व साधनांचा वापर करावा, असे आवाहन विद्युत निरीक्षक साजिदा मुल्ला यांनी केले.

**विद्युत निरीक्षक साजिदा मुल्ला यांचे आवाहन**

शिवाजी विद्यापीठ आणि विद्युत निरीक्षक कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयसीटी ट्रेनिंग सेंटरमध्ये आयोजित 'विद्युत सुरक्षा सप्ताह' कार्यक्रमात त्या बोलत होत्या. उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे अध्यक्षस्थानी होते.

विद्युत निरीक्षक साजिदा मुल्ला म्हणाल्या, विजेच्या दोऱ्यांवर कपडे वाळवू नयेत. विजेची उपकरणे नादुरुस्त झाल्यास घरच्या घरी दुरुस्त करण्याचा प्रयत्न करु नये. ठराविक कालावधीनंतर वायरिंग बदलून घ्यावी. आयएसआय प्रमाणित उपकरणांचा वापर करावा. चित्रफितीद्वारे विद्युत निरीक्षक मुल्ला यांनी संभाव्य विद्युतहानी कशी टाळता येते याबद्दल सविस्तर माहिती दिली. यावेळी उपकुलसचिव डॉ.जी. एस. कुलकर्णी, विद्युत निरीक्षक आसमा बागवान, उपअभियंता अमित कांबळे, रणजित यादव, शिवकुमार ध्याडे यांच्यासह तंत्रशिक्षण विद्यार्थी उपस्थित होते.